**स्पे.मु.नं. ०६/२०१५**
**रूक्मीणी देशमुख वगैरे विरुध्द गणपत महाडीक वगैरे**

## निशाणी क्र. ९० वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. या कामी वादीने दाखल केलेल्या कागदावर प्र.वादी नं. २ ते ३ यांनी घेतलेल्या हरकत अर्जावर चौकशी व हुकुम होणेवर तारखा चालत असलेने प्र.वादी १ यांनी वादीचा उलट तपास घेणे बाबत तजवीज केली नसलेने त्यांचे बाबत नो क्रॉसचा हुकुम झाला आहे. दावा स्थावर मिळकतीचा असलेले त्यांना यास उलट तपासाची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे व शेवटी त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. वादीने त्याचे म्हणणे प्रस्तुत अर्जाच्या मलपृष्ठावर दाखल केले व अर्जात दिलेले कारण योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र. १ अ व २ आणि ३ हे सामील आहेत त्यामुळे प्र.वादी क्र. १ अ हा जाणून बुजून गैरहजर राहत आहे व प्रकरणाचे कामकाज लांबवत आहे त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे व शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्ज वाचला, त्यावरील वादीचे म्हणणे पाहीले, अभिलेख

अवलोकीला. उभयपक्षकारांचे  विद्वान विधीज्ञांना ऐकले. अर्जात नमुद कारण संयुक्तीक वाटल्याने व नैसर्गिक न्याय तत्वानुसार प्रतिवादीस संधी देणे गरजेचे असल्याने  अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब आदेश .

**आदेश**

अर्ज निशाणी ९० विनंतीनुसार मंजुर करण्यात येतो.

दिनांक – २८.१०.२०२१ सही../-

माळशिरस. दि.न्या.व स्तर, माळशिरस